**प्रेसनोट दिनांक ०९/०३/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**दोन वर्षापासुन फरार आरोपीस केले अटक**

चंदननगर पो.स्टे. चे पोउनि. अंबरीष देशमुख यांना दि.०९/०३/२०१९ रोजी पहाटे ०४.३० वा. चे सुमारास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वसमत ग्रामीण जिल्हा हिगोली येथे भा.द.वि. कलम ३०७ मधील पाहीजे आरोपी नामे स्वप्नील रामकिसन देसाई, वय-२७ वर्षे, रा- मु पो. चुडावा, ता. पुर्णा, जि. परभणी हा गुन्हा दाखल झालेपासुन सुमारे २ वर्षेपासुन फरार असुन तो पुणे शहरामध्ये वेशांतर करुन राहात असुन सध्या तो गणेशनगर चौक, वडगांवशेरी, पुणे येथे उभा असलेची बातमी मिळाली होती. त्याच्या अंगामध्ये राखडी रंगाचा शर्ट व निळी जिन्स पॅन्ट आहे, वगैरे बातमी मिळालेने पोउनि. देशमुख व पोलीस स्टेशन कडील पो.ना. १६८३, चेतन गायकवाड, पो.ना.९२१, संदिप मुंढे, पो.कॉ. ७३२४ जिर्तेंद्र कोळी असे स्टाफसह सदर ठिकाणाचे जवळ जावुन गोपनियपणे त्याची पाहाणी केली असता वरील वर्णनाप्रमाणे पेहराव असलेली व्यक्ती चौकामध्ये उभी असल्याची दिसली. तसेच त्याचे संशयास्पद हालाचालीवरुन त्याचेबाबत संशय बळावल्याने वरील स्टाफने लागलीच त्यास जागीच ०५.०० वा. पकडुन त्याचे नाव व पत्ता विचारता, त्याने त्याचे नाव स्वप्नील रामकिसन देसाई, वय-२७ वर्षे, रा- मु पो. चुडावा, ता. पुर्णा, जि. परभणी असे असल्याचे सांगितले. त्याचे खात्रीसाठी त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅन्टच्या खिशात त्याचे स्वतः चे नावचे आधार कार्ड मिळुन आले. तेव्हा सदर इसम हा वसमत पोलीस स्टेशन येथील गु.र.नं. ३२/२०१७, भा.द.वि. कलम ३०७ मधील पाहीजे आरोपी असल्याचे खात्री झाली. त्याचेबाबत वसंमत पो.स्टे. हिंगोली येथे संपर्क साधुन तेथील सपोनि. बंदखडके यांचेशी संपर्क करुन खात्री करुन त्यांचे स्टाफला पुणे येथे ताब्यात घेण्यासाठी बोलाविले. त्यावेळी सदर इसमाचेविरुध्द आणखी दोन भा.द.वि. कलम ३०७ प्रमाणे गुन्हे दाखल असलेची माहिती मिळाली आहे. सदर आरोपीतास आज दि. ०९/०३/१९ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास वसमत पोलीस स्टेशन कडील पा हवा. ८२, बी व्ही मिरासे, पो शि. ९१५, एस पी सुरुशे यांचे ताब्यात पुढील तपासकामी सुस्थीथीत दिलेले आहे.

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त साो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी साो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री अक्कानवरू साो, सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. श्री. शिवाजी पवार साो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कृष्णा इंदलकर, पो.नि.गुन्हे - राजेंद्र काळे, पोउनि. अंबरीष देशमुख पो.ना. चेतन गायकवाड, पो.ना. संदिप मुंढे, पो.कॉ. जिर्तेंद्र कोळी यांनी केलेली आहे. सदर आरोपीसह घेण्यात आलेला फोटो यासोबत सादर करीत आहोत.